स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

MAHAPREIT

महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, मर्यादित. मुंबई

## सर्व अधिकारी व कर्मचारी बंधू-भगिनींनो,

नववर्षाच्या सर्वांना आरोग्यमय शुभेच्छा! आपणाला नवीन वर्षाच्या शुभेच्छा देताना माझे मन आपल्याविषयीच्या अभिमानाने भरून आले आहे. आज आपला देश कोरोना या भीषण महामारीशी लढत आहे. आपण सर्वजण आपल्या कर्तव्याकरिता कामावर हजर राहून आपल्या जीवाची पर्वा न करता, धोका पत्करून काम करीत आहात. या परिस्थितीत आपल्या सर्वांचे मोठे योगदान आहे. मा. सामाजिक न्यायमंत्री महोदयांनीही याबाबत सर्वांचे जाहीर कौतुक केले आहे.

मावळतं २०२१ हे वर्ष अनेक संकटांना, आव्हानांना घेऊन आलं. मात्र, म. फु. मा. वि. म. व `महाप्रित`च्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केलेल्या सांघिक कामामुळे आणि निर्धाराच्या बळावर आपण या आव्हानांचा यशस्वी मुकाबला केला. म. फु. मा. वि. म. व `महाप्रित`च्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी यापुढेही अशीच एकजुट कायम ठेवायची आहे.

राज्य आणि देशासमोर ओमिक्रॉनचा धोका आणि कोरोना रूग्णांची वाढती संख्या हे नवीन आव्हान नववर्षाच्या सुरूवातीलाच उभं ठाकलं आहे. कोरोना प्रतिबंधक नियमांचं आणि आदर्श कोरोना आचारसंहितेचे पालन करून आपण या संकटावर लवकरच विजय मिळवू, असा मला विश्वास आहे.

अनुसूचित जाती व नवबौध्द समाजातील नागरिकांना उद्योग उभारणींसह रोजगार देण्यासाठी `महाप्रित` कटिबध्द आहे. भविष्यातही, आपण अपारंपरिक व नविनीकरणीय ऊर्जा (सोलर पार्क), कृषी प्रक्रिया उद्योग, सॉफ्टवेअर पार्क, राखेपासून विविध वस्तूंची निर्मिती, रस्ते बांधकाम, गृहनिर्माण, इमर्जिंग टेक्नॉलॉजीशी संबंधित म्हणजे रोबोट, ड्रोनसह नवीन तंत्रज्ञानाशी संबंधित उद्योग, पर्यावरणाशी संबंधित नवीन उद्योग उभारण्यासाठी मदत करणार आहोत.

आपण मिळून `म. फु. मा. वि. म. व महाप्रित`चे नाव व प्रतिमा अधिक उज्ज्वल करू, याचा मला विश्वास आहे. अनुसूचित जाती व नवबौध्द समाजातील नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी आपण सर्वांनी पुन्हा एकदा दृढसंकल्प करूयात!

# Happy New Year 2022

**बिपीन श्रीमाळी** (भा.प्र.से.)
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक,
म. फु. मा. वि. म. व महाप्रित

